**<u>नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०२३ मधील</u>**
**<u>नि.क्र.६ वरील आदेश</u>**

श्री. पांडुरंग नागोजी घोळसे, वगैरे.
वि.
श्री. धाकलू सुबराव पाटील, वगैरे.

प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. नि.क्र.६ वर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (यापुढे ज्याचा उल्लेख 'संहिता' असा करण्यात आला आहे.) चे क्रम ६, नियम १७, अन्वये दाखल केलेल्या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वादी या अर्जाव्दारे या दाव्यामध्ये नमुद मागण्यापैकी ९–ब मधील मागणी त्यांना मागण्याची नसून ती दाव्यातून कमी करून त्याप्रमाणे दुरूस्तीस परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. अर्जास वादी यांच्या शपथपत्राची पुष्टी आहे.

२. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एन.जी.आजरेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :–

> *"१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.*

*परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही."*

४. अभिलेखाची पाहणी केली असता वादी यांनी हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता सदर दावा दाखल केलेला आहे. वादी यांची अर्जातील मागणी मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदर दुरूस्तीमुळे प्रकरण गुणदोषावर तसेच, उभय पक्षकारांमधील वाद संपूर्ण वादाचे एकाच दाव्यामध्ये निराकारण होऊन न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे.

सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सदर दाव्यामध्ये अद्याप प्रथम आदेश पारीत करण्यात आलेला नाही. दावा हा प्रथम टप्प्यात दिसून येत आहे. त्यामुळे, वादीचा प्रस्तुत अर्ज संहितेचे क्रम ६, नियम १७ अन्वये मान्य करता येईल. सबब, निम्न आदेश.

## आ दे श

नि.क्र.६ वरील वादीचा वादपत्र दुरुस्तीचा अर्ज मान्य करण्यात येत आहे.

वादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.09.15 17:20:02 +0530

दि. १५/०९/२०२३
चंदगड

(**चारूदत्त उद्धव शिपकुले**)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड